# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३१/१०/२०२४ (गुरूवार) सायंकाळ**

---

## सहायक पोलीस निरीक्षक श्री मनोज एस. चौधरी पोलीस ठाणे मौदा जिल्हा नागपूर ग्रामीण यांना केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक २०२४ ने सम्मानीत

नुकत्याच दिनांक ३१/१०/२०२४ रोजी भारत सरकार, गृह मंत्रालय, नवी दिल्ली या विभागामार्फत जाहीर झालेल्या ''केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक २०२४'' मध्ये नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील पोलीस ठाणे मौदा येथे कार्यरत असलेले सहायक पोलीस निरीक्षक मनोज एस. चौधरी हे सन २०२१ मध्ये पोलीस ठाणे काटोल येथे कार्यरत असताना त्यांनी केलेल्या उत्कृष्ठ तपासाबद्दल त्यांना भारत सरकार, गृह मंत्रालयातर्फे केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक २०२४ हे सन्मान चिन्ह जाहीर करून सन्मानीत केले आहे.

सहायक पोलीस निरीक्षक श्री मनोज एस. चौधरी हे पोलीस ठाणे काटोल येथे कार्यरत असताना दि ०५/१०/२०२१ रोजी पिडीत मयत राजकुमारी मंगलसिंग सलाम वय २५ वर्ष हिचा आरोपी अमलेशकुमार शंभू मंडल, वय २० वर्ष, रा. गद्दी, पोस्ट व ता. राघोपूर, जि. सुकोल, बिहार याने बलात्कार करून निघृण खुन केला होता. त्यावरून पोलीस ठाणे काटोल येथे अपराध कमांक ५१६/२०२१ कलम ३०२, ३५४, ३५४(ब), ३७६ भादंवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याचे तपासी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक श्री मनोज एस. चौधरी यांनी गुन्ह्याचा शास्त्रोक्त पध्दतीने तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुरावे गोळा करून व अत्यंत परिश्रमाने गुन्ह्याचा तपास मुद्दतीत पुर्ण करून आरोपी विरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आला.

सदर गुन्ह्याचा न्यायालयीन संपरिक्षेत सपोनि मनोज चौधरी यांनी तपासादरम्यान न्यायालयासमक्ष दाखल केलेले शास्त्रोक्त पुरावे व साक्षीदार या आधारे न्यायालयाने आरोपीस सदर गुन्ह्यात दोषसिध्द ठरवुन दि. ०४/१०/२०२३ रोजी दिलेल्या न्याय निर्णयात आरोपीस आजन्म कारावासाची शिक्षा सुनावली.

सपोनि चौधरी यांनी सदर गुन्ह्यात केलेल्या अत्यंत मेहनतीने व शास्त्रोक्त पध्दतीने केलेल्या तपासाची महाराष्ट्र शासनाकडून दखल घेऊन सदर गुन्हा हा ''केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक २०२४'' चे उत्कृष्ट तपास या शिर्षकाखाली पदकासाठी शिफारस करण्यात आली होती. दिनांक ३१/१०/२०२४ रोजी भारत सरकार, गृह मंत्रालय, नवी दिल्ली या विभागामार्फत सपोनि चौधरी यांना सदर पदक घोषित करण्यात आलेले आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर